**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन आदेश क्र.एफएसटी-०२/२६/प्र.क्र.३३/वने-४**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२**
**दिनांक:- २७ मे, २०२६**

**संदर्भ:-**

१. समक्रमांकाचा दि.१३.०५.२०२६ रोजीचे नियतकालिक बदली आदेश.
२. मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, खंडपीठ नागपूर येथील मूळ अर्ज क्र.५५२/२०२६ मधील दि.२६.०५.२०२६ रोजीचे आदेश.
३. मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, खंडपीठ नागपूर येथील मूळ अर्ज क्र.५६३/२०२६ मधील दि.२६.०५.२०२६ रोजीचे आदेश.

**शासन आदेश:-**

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतुदी व मा. न्यायाधिकरणाचे संदर्भाधीन क्र.०२ व ०३ येथील आदेश विचारात घेता, खालील वनपरिक्षेत्र अधिकारी, गट-ब (राजपत्रित) यांच्या रकाना क्र.३ येथील पदस्थापनेत अंशत: बदल करण्यात येऊन त्यांची पदस्थापना रकाना क्र.४ येथील नमूद पदावर प्रशासकीय कारणास्तव सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने करण्यात येत आहे.

| अ.क्र. | व.प.अ. यांचे नाव | दि.१३.०५.२०२६ च्या आदेशानुसार पदस्थापना | दि.१३.०५.२०२६ च्या आदेशात अंशत: बदल करुन सुधारित पदस्थापना |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्री.अभिजीत बापूदास इलमकर | व.प.अ., विशेष व्याघ्र संरक्षण दल-३, नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव, गोंदिया | व.प.अ., नागलवाडी (वन्यजीव), पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर या रिक्त पदावर |
| २ | श्री.निलेश रमेश गांवडे | व.प.अ.,अतिक्रमण निमुर्लन, धारणी, मेळघाट वन विभाग | व.प.अ., पूर्व पेंच पिपरिया (वन्यजीव), पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर या रिक्त पदावर |

२. सदरहू आदेश तात्काळ अंमलात येत असून उपरोक्त वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी बदलीच्या ठिकाणी तात्काळ रुजू व्हावे.

३.	महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतनू काढून टाकणे यांच्या काळांतील प्रदाने) नियम, १९८१ मधील नियमानुसार दिलेल्या विहित कालावधीत संबंधित अधिकारी यांनी पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होण्याची दक्षता घ्यावी अन्यथा या पदस्थापनेच्या पदावर रुजू न झाल्यास, त्यांचा अनुपस्थितीचा कालावधी हा "अकार्यदिन" (dies-non) म्हणून गणला जाईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

४.	संबंधित अधिकाऱ्यास शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणत्याही कारणास्तव रजा मंजूर करु नये. तसेच, महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मधील नियम-३० (सी) नुसार मूळ कार्यालयाने बदली झालेल्या अधिकाऱ्यांचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्वीकारु नयेत. असे अर्ज प्राप्त झाल्यास ते संबंधित अधिकाऱ्यांना मूळ पत्त्यावर नोंदणी पोच देय डाकेने परत करावेत.

५.	सदरहू आदेशानुसार संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी हे तात्काळ पदस्थापनेच्या पदावर रुजू न झाल्यास वा कोणत्याही प्रकारचा दबाव आणून बदली रद्द करण्याचा प्रयत्न झाल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम २३ चे उल्लघंन करणारी असल्यामुळे, ती गैरवर्तणूक समजून त्यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, यांची संबंधितांनी नोंद घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(निकेता पांडे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३) सर्व मुख्य वनसंरक्षक/ वनसंरक्षक.
४) महालेखापाल (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
५) मा.मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) अपर मुख्य सचिव (वने) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
७) संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी यांना अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्या मार्फत.
८) निवडनस्ती (वने-४)